REVIEW OF RESEARCH

# महाराष्ट्रातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये माहिती अधिकार अधिनियम २००५ कलम ४(१)(ख) अंतर्गत स्वयंप्रकटने बाबत सद्यस्थिती आढावा

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019




श्री. नवीन महेशकुमार अग्रवाल

रजिस्ट्रार, दादा रामचंद बाखरू सिंधु महाविद्यालय, पांचपावली, नागपूर.

## प्रस्तावना:—

प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्याचा दृष्टीने, सार्वजनिक प्राधिकरणांच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळवता यावी म्हणून, नागरिकांच्या माहिती मिळण्याचा अधिकाराची व्यवहार्य शासन पध्दत आखून देण्याकरिता, केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी माहिती अधिकार अधिनियम २००५ हा कायदा तयार करण्यात आला आहे। लोकशाही मध्ये माहितगर नागरी समुह घडविणे, शासन कारभारात नागरिकांचा सहभाग वाढवणे, कार्यप्रणाली मध्ये पारदर्शकता व खुलेपण निर्माण करणे, शासन यंत्रणे मध्ये नागरिकांच्या प्रति उत्तरदायित्व निर्माण करणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे आदि या कायद्याचे प्रमुख उद्दिष्टे आहेत।

नागरिकांद्वारे माहिती मिळण्याकरिता अर्ज सादर केल्यावर माहिती प्रदान करणे सर्व सार्वजनिक प्राधिकरणांकरिता बंधनकारक आहेच परंतु या कायद्याची सर्वाधिक महत्वाची बाब म्हणजे स्वत:हून माहिती प्रकट करण्याची आबंधने सुध्दा सार्वजनिक प्राधिकरणांवर घलण्यात आली आहे। सार्वजनिक प्राधिकरणांची कार्ययंत्रणा अधिक पारदर्शक बनविण्याकरिता तसेच माहिताचा अधिकारात अर्ज करून माहिती प्राप्त करण्याची गरज कमी करण्याकरिता कलम ४(१)(ख) अन्वये निर्धारित केलेली १७ विषयांची माहिती या अधिनियम अधिनियमित झाल्याचापासून एकशेवीस दिवसाच्या आत स्वत:हून प्रसिध्द करणे व त्यानंतर दरवर्षी अद्यावत करणे सर्व सार्वजनिक प्राधिकरणांसाठी बंधनकारक आहे। इतकेच नव्हे, माहिती मिळण्यासाठी लोकांना या अधिनियमाचा कमीत कमी आधार घ्यावा लागावा यासाठी नियमित कालांतराने लोकांना इंटरनेटसह, संपर्काच्या विविध साधनांद्वारे, स्वत:हून माहिती पुरविण्यासाठी उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणांना सतत प्रयत्नशील राहण्याचे निर्देश कलम ४ (२) मध्ये देण्यात आले आहे। ४(१)(ख) ची प्रभवीपणे अमलबजावणी व्हावी या करिता सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र. केंमाअ २०१३/१५६/प्र.क्र.३६०/सहा, दि. ०९/०५/२०१४ मध्ये निर्देश देण्यात आले आहे कि ज्यां सार्वजनिक प्राधिकरणांनी अद्यापही कलम ४ च्या तरतूदींनुसार अपेक्षित १७ बाबींवरील माहिती तयार करून जनतेकरिता उपलब्ध केलेली नाही व वेबसाईटवर प्रसिध्द केलेली नाही तसेच अद्यावत केली नाही अशा सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी ही कार्यवाही प्राथम्यक्रमाने पूर्ण करावी, व याकरिता सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सार्वजनिक प्राधिकरणांना त्यांच्या स्तरावर आवश्यक सूचना देऊन या बाबत पाठपुरावा करावा। म्हणजेच सदर

परिपत्रकाद्वारे १७ बाबींवरील माहिती तयार करून वेबसाईटवर प्रसिध्द करणे अनिवार्य करण्यात आले आहे।

वर्तमानमध्ये शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी शासनाकडून शैक्षणिक संस्थांना मोठा प्रमाणत वित्त पुरवठा केला जात आहे, त्यात शासकीय शैक्षणिक संस्थांपेक्षा अशासकीय संस्थाची संख्या अधिक आहे, व या संस्थांना राज्याचा एकत्रित निधीमधून अनुदान दिला जाते, हया निधीचा उपयोग योग्य प्रकारे केला जात आहे कि नाही या साठी अश्या संस्थांना सुध्दा सार्वजनिक प्राधिकरणाच्या कक्षेत या कायद्याने उभा केला आहे जी महत्वाची बाब आहे। कारण शैक्षणिक संस्था ही ज्ञानाचा मंदिर असते येथे शिक्षा प्राप्त करणारे विद्यार्थ्यांच्या हाती भविष्यात राष्ट्राची बागडोर जाणार आहे। त्यामुळे कायद्याचे पालन सर्वप्रथम शिक्षण संस्थेद्वारे करणे महत्वाचे आहे।

महाविद्यालयांना यूजीसी, नैक बैंगलोर व शासनाद्वारे महाविद्यालयाची वेबसाईट तयार करणे अनिवार्य करण्यात आले आहे, त्यामुळे सर्व अनुदानित महाविद्यालयांनी कलम ४ च्या तरतूदीनुसार अपेक्षित असलेली १७ बाबींची माहिती तयार करून वेबसाईटवर प्रसिध्द केलेली आहे का याचा सद्यस्थिती आढावा घेण्याकरिता सदर अध्ययन करण्यात आला आहे।

## संशोधन पध्दति:—

**अनुदानित महाविद्यालयांकरिता —** सदर लेखमध्ये प्रस्तुत करण्यात आलेली माहिती एकत्रित करण्याकरिता महाराष्ट्रातील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील असलेले १० विभागाच्या कक्षेत येणारे प्रत्येक विभागातील ०५ महाविद्यालयाचे वेबासाईटवर जाऊन वेबासाईटवर उपलब्ध असलेली माहिती व त्या महाविद्यालयांच्या अधिकाऱ्यांसोबत दूरध्वनिच्या माध्यमेने झालेल्या संवाद चा आधार घेण्यात आला आहे।

अनुदानित महाविद्यालयांचे वरील पध्दतिप्रमाणे सर्वे केल्यानंतर प्राप्त झालेली माहिती व आंकडे खालील तक्त्यात दर्शविण्यात आली आहे:—

तक्ता १ :— महाराष्ट्रातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयांची स्वयंप्रकटने बाबत सद्यस्थिती

| अ. क्र. | उच्च शिक्षण संचालनलयचा अधिपत्याखालील विभागीय कार्यालय | एकूण अनुदानित महाविद्यालयांची संख्या | वेबसाईटचे सर्वे केलेल्या महाविद्यालयांची संख्या | वेबसाईटवर १७ बाबींवरील माहिती प्रसिध्द केलेल्या महाविद्यालयाची संख्या | महिती अधिकार अधिनियम चे प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी असलेल्या महाविद्यालयाची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | नागपूर | १९० | ०५ | ०१ | ०१ |
| २ | कोल्हापूर | १३२ | ०५ | ०० | ०० |
| ३ | औरंगाबाद | ११२ | ०५ | ०० | ०० |
| ४ | अमरावती | १४९ | ०५ | ०० | ०० |
| ५ | मुंबई | ९९ | ०५ | ०३ | ०२ |
| ६ | पूणे | १६६ | ०५ | ०२ | ०१ |
| ७ | जलगांव | ८३ | ०५ | ०० | ०० |
| ८ | नांदेड | ९७ | ०५ | ०० | ०० |
| ९ | पनवेल | ९४ | ०५ | ०१ | ०१ |
| १० | सोलापुर | ४० | ०५ | ०० | ०० |
| | एकूण | ११६२ | ५० | ०७ | ०५ |

तक्ता — १ नुसार

१) महाराष्ट्रातील १० विभागात एकूण ११६२ अशासकीय अनुदानित महाविद्यालय आहे, त्यापैकी प्रत्येक विभागातील ०५ असे एकूण ५० महाविद्यालयाचा समावेश या संशोधनात करण्यात आला असून त्या ५० महाविद्यालयापैकी फक्त

१४ टक्के महाविद्यालयानी आपल्या वेबसाईट वर कलम ४ (१)(ख) ची १७ बाबींवरील माहिती प्रसिध्द केली आहे। १७ बाबींवरील माहिती वेबसाईटवर प्रसिध्द न करणाऱ्या महाविद्यालयाची संख्या ८६ टक्के आहे।

२) नागपूर विभागातील २० टक्के, मुंबई विभागातील ६० टक्के, पूणे विभागातील ४० टक्के, पनवेल विभागातील २० टक्के, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, जलगांव, नांदेड व सोलापुर विभागातील ० टक्के महाविद्यालयांनी १७ बाबींवरील माहिती वेबसाईटवर प्रसिध्द केली आहे।

३) ज्या विभागातील महाविद्यालयांनी वेबसाईटवर माहिती प्रसिध्द केली आहे (नागपूर, मुंबई, पूणे व पनवेल) त्या विभागातील २५ टक्के महाविद्यालयात माहिती अधिकार अधिनियम २००५ चे प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी उपलब्ध आहे।

४) ज्या विभागातील महाविद्यालयांनी वेबसाईटवर माहिती प्रसिध्द केली नाही (कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, जलगांव, नांदेड व सोलापुर) त्या विभागातील १०० टक्के महाविद्यालयात माहिती अधिकार अधिनियम २००५ चे प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी उपलब्ध नाही।

५) संपूर्ण महारष्ट्राचा विचार केला तर एकूण ५० महाविद्यालयापैकी फक्त १० टक्के महाविद्यालयात माहिती अधिकार अधिनियम २००५ चे प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी उपलब्ध आहे।

## निष्कर्ष:—

१) महाराष्ट्रातील बहुतांश अनुदानित महाविद्यालयांनी १७ बाबींची माहिती वेबसाईट वर प्रसिध्द केलेली दिसत नाही। ज्याचे प्रमुख कारण माहिती अधिकार अधिनियम २००५ चे प्रशिक्षण घेतलेले कर्मचारी उपलब्ध नसणे तसेच या महाविद्यालयांना व शाळांना वरिष्ठ कार्यालयांकडून निर्देश प्राप्त न होणे आहे।

२) नागरिकांना १७ बाबींची माहिती उपलब्ध नसल्याने माहिती प्राप्त करण्याकरिता माहिती अधिकारात अर्ज करून माहिती प्राप्त करणे हा एकच विकल्प उपलब्ध आहे, परिणाम स्वरूप माहिती अधिकारातील अनावश्यक अर्जाची संख्येत वाढ होत आहे।

३) शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची सोय उपलब्ध नाही।

## सुझाव:—

महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था शासनाने करण्याची कार्यवाही करावी। महाविद्यालयातील जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ चे प्रशिक्षण घेणे अनिवार्य करण्यात यावे।

तसेच शिक्षा विभागातील वरिष्ठ कार्यालयांनी एक कमेटी तयार करावी, सर्व महाविद्यालयांनी १७ बाबींची माहिती प्रसिध्द केली असल्याची खात्री सदर कमेटी ने करावी व त्याचा योग्य पाठपुरावा घेण्यात यावा।

## शोधचा लाभ:—

१) या शोधमुळे महाविद्यालयांची स्वयंप्रकटने बाबत सद्यस्थिती आढावा प्राप्त झालेला आहे, त्यामुळे शासनाला महाविद्यालययात कलम ४ (१)(ख) ची अमलबजावणी करिता योग्य कार्यवाही व उपाय योजना तयार करण्यास सहकार्य मिळेल।

२) महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता योग्य कार्यवाही व उपाय योजना तयार करण्यास सहकार्य मिळेल।

३) माहिती अधिकार अधिनियम २००५ चे प्रशिक्षण प्राप्त केल्यावर तसेच सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन यांचे परिपत्रक क्र. केंमाअ २०१३/१५६/प्र.क्र.३६०/सहा, दि. ०९/०५/२०१४ मध्ये दिलेल्या निर्देशानुसार सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील महाविद्यालयांना त्यांच्या स्तरावर आवश्यक सूचना देऊन या बाबत पाठपुरावा केल्यास निश्चितच सर्व महाविद्यालय द्वारे १७ बाबींची माहिती प्रसिध्द केली जाईल ज्याचा लाभ नागरिकांना मिळेल व त्यांना बहुतांश माहिती वेबसाईट व इतर माध्यमातून मिळण्याचे इतर विकल्प उपलब्ध होऊ शकेल, त्यामुळे महाविद्यालयाच्या कामकाजात पारदर्शकता वाढेल व माहिती अधिकारांतर्गत केल्या जाणारे अर्जाची संख्या कमी होईल।

संदर्भ:—
माहिती अधिकार अधिनियम २००५
उच्च शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य यांची वेबसाईट dhepune.gov.in
यशदा पूणेची वेबसाईट yashada.org
यशदा पूणे द्वारे प्रकाशित विविध पुस्तके
विविध महाविद्यालयाची वेबसाईट वर उपलब्ध असलेली माहिती व त्यांच्या सोबत दूरध्वनिद्वारे झालेला संवाद



श्री. नवीन महेशकुमार अग्रवाल
रजिस्ट्रार, दादा रामचंद बाखरू सिंधु महाविद्यालय, पांचपावली, नागपूर.